The Notice and Annual Report has been uploaded on the website of the Stock Exchange i.e BSE Limited at www.bseindia.com respectively.

The Register of Members and Share Transfer Books of the Company will remain closed from Thursday, September 23, 2021 to Tuesday, September 28, 2021 (both days inclusive).

Members are also permitted to the AGM through VC/OAGM, 15 minutes before the scheduled time of commencement of AGM and during the AGM through https://m.teamlink.co/2914815433?p=ec844c9313358c43b7f52aeec6928e17

The attendance of the Members participating in the AGM through VC / OAVM will be counted for the purpose of ascertaining the quorum under Section 103 of the Act

Members, who need any technical assistance before or during the AGM can contact **Mr. Rajkumar Mohan Keswani "General Manager- Operations"** keswani@evanselectric.co.in / and CS Simpi Sahani at Email ID cs@evanselectric.co.in

As per provision of Section 107 of the Companies Act, 2013, Evans Electric Limited ("the Company) is pleased to provide its members the facility to exercise their right to vote at the 70 th Annual General Meeting (AGM) by Show of hands/ Poll at the meeting through VC/AVM.

All the members are hereby informed that:

- The Company has fixed Wednesday, **22 nd September, 2021** as the 'Record Date' for determining entitlement of members to final dividend for the Financial Year ended March 31, 2021, if approved at the AGM.
- For the limited purpose of receiving the Notice and the Annual Report through electronic mode in case the email address is not registered with the Dps/ Company/RTA, members may register the email IDs using the facility provided by the RTA through the email investor@bigshareonline.com/ vinayak@bigshareonline.com.

For Evans Electric Ltd.
Sd/-
Managing Director
Nelson Fernandes

Date: September 5, 2021
DIN:00985281
Place: Mumbai

SOUTH EAST CENTRAL RAILWAY

TENDER NOTICE FOR ELECTRIFICATION WORK OF ADDITIONAL LOOP LINE

Tender No. : 04-Tender-EL-CON-SECR-BSP-2021. Date: 25.08.2021

Name of Work : "Provision of OHE for direct entry to CONCOR siding from DN & UP side through 4 no's new X-overs & Electrification of additional loop line at Naya Raipur, for connectivity of CONCOR siding in Raipur division over S.E.C. Railway". **Tender Value: ₹ 96,87,839.13** (Rupees Ninety Six Lakhs Eighty Seven Thousands Eight Hundreds Thirty Nine & Thirteen Paise Only.), **EMD Cost : Nil**, **Date and timing of tender closing : 15.09.2021** at **15:30** Hrs, **Comptetion period: 12** (Twelve) Months from the date of issue of LOA, **Website particular and Notice Board location:** For further details /related to tender document, eligibility criteria & the complete details for the above work, please contact office of the Chief Administrative Office(Con)/SECR/Bilaspur or Chief Electrical Engineer (Con)/SECR/Nagpur or refer/download tender document which is available on our website **http://www.ireps.gov.in**.

Divil. Elect. Engineer (Con)
S.E.C. Railway/Raipur
CPR/10/151

South East Central Railway @secrail

Public Notice

Notice is hereby given to the Public that **Late Dinanath Keshav Karpe** was the owner of the property bearing Flat No 13, 2nd Floor, Shravani Building, society known as Ashapuri Nagar, Panvel. The said property has been constructed on Final Plot No. 208B, Taluka Panvel District Raigad. He died on 30/07/2017. His legal heirs (1) Pradnya Dinanath Karpe, (wife) and (2) Nikhil Dinanath Karpe (son) claiming that they are only legal heirs of late Dinanath Keshav Karpe. If anyone else other than two mentioned hereinabove claiming any legal rights towards the said flat as heirs of Late Dinanath Keshav Karpe, should send their claims in writing to the undersigned along with documentary evidence in support of the said claim thereof within 15 days of publication of the said notice failing which, claims if any shall be deemed to have been waived.

(1) Pradnya Dinanath Karpe
(2) Nikhil Dinanath Karpe
Flat no. 13, 2nd Floor, Shravani building, Ashapuri Nagar, Panvel
Contact: **9869484165**

SOUTH EAST CENTRAL RAILWAY

E-TENDER NOTICE FOR ENGINEERING WORKS

Sr. No. (1) Tender No.: SECR-HQ-Engg.-BL-21-22-02.
Work: Miscellaneous Maintenance of bridges like through/patch painting, greasing, Provision of corrosion guard, replacement of cracked/damaged member, elastomeric bearings etc. in the jurisdiction of SSE/Bridge/NIR in Nagpur Division. **Tender Value:** ₹ 44,38,368.03. **Bidding Start Date: 16.09.2021. Tender Closing Date & Time : 16.30 hours on 30.09.2021.**

Sr. No. (2) Tender No.: SECR-HQ-Engg.-BL-21-22-03.
Work: Miscellaneous Maintenance of bridges like through/patch painting, greasing,epoxy,replacement of cracked/damaged member and loose rivets etc. in the jurisdiction of SSE/Bridge/SDL in Bilaspur Division. **Tender Value:** ₹ 24,63,861.48. **Bidding Start Date: 16.09.2021. Tender Closing Date & Time : 16.30 hours on 30.09.2021.**

Sr. No. (3) Tender No.: SECR-HQ-Engg.-BL-21-22-04.
Work: Miscellaneous Maintenance of bridges like through/patch painting, greasing,epoxy, Provision of corrosion guard to side pathway brackets, replacement of cracked/damaged member and loose rivets etc. in the jurisdiction of SSE/Bridge/BSP in Bilaspur Division. **Tender Value:** ₹ 32,05,269.22. **Bidding Start Date: 16.09.2021. Tender Closing Date & Time: 16.30 hours on 30.09.2021.**

For further details for the above work, please contact office of the Dy. CE/Bridge line/Bilaspur or website: **http://www.ireps.gov.in**

Dy. CE/Br.Line/S.E.C. Railway /Bilaspur.
CPR/10/153

South East Central Railway @secrail

IN THE COURT OF CITY CIVIL COURT AT BOMBAY BORIVALI DIVISION, AT DINDOSHI, MUMBAI COMMERCIAL SUIT NO. 273 OF 2019

ICICI BANK LIMITED
Banking Company incorporated Under the Companies Act, 1956 and licensed as a bank under the Banking Regulation Act, 1949 and having its registered office at ICICI Bank Tower, Near Chakli Circle, Old Padra Road, Vadodara- 390 007, Gujarat and having Corporate office at ICICI Bank, Towers, 4th Floor, South Tower, Bandra-Kurla Complex, Bandra (E), Mumbai 400051 through its Power of Attorney Holder
Mrs. Shilpa Vasant Nikam,
The Debt Manager, Age 36 years
Occupation: Service ..Plaintiff

Versus

Vandana Gulabdhar Mishra
Age 33 years, Occupation: Service 302 C 4, Shanti Vihar, 3rd Floor Shanti Vihar Complex, Opp Pravirkumar G High School, Mira Road (E) Thane- 401 107
..Defendant

Take Notice that, this Hon'ble court will be moved before this Hon'ble Asst. Session Judge **Shri. A.Z. KHAN** presiding in the court room No.02 on **07.09.2021 at 11:00 O'Clock** in the forenoon by the above named Defendant for the following reliefs:

a. That this Hon'ble Court be pleased to directed the office of this Hon'ble court to refund a sum of **Rs.5,70,190.10/- (RUPEES FIVE LAKHS SEVENTY THOUSAND ONE HUNDRED NINETY AND TEN PAISE ONLY)**
b. Ad-interim relief in terms of prayer (a) above.
c. Such other and further relief as the nature and circumstances of the case may require.

Dated this 23th Day of August 2021
For Registrar.
City Civil Court,
Dindoshi.

M/s. Bhide & Associates
Advocates For the Plaintiffs
D- 94, 15th Road, Plot No. 187,
Chembur, Mumbai- 400071.

निवडक...

प्रवासी बोट लोकार्पण

वसई – रविवारी पाणजू बेट ते नायगाव अशा प्रवासी फेऱ्या करणार असलेल्या बोटीचे पालघर जिल्ह्याचे खासदार राजेंद्र गावित, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस विजय पाटील व वसई पंचायत समितीच्या सभापती वनिता तांडेल यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. त्याच बरोबर यावेळी पाणजू बेटावरील गावकऱ्यांसाठी उभारण्यात येत असलेल्या व्यायाम शाळेचे भूमिपूजनही अन्य स्वतंत्र कार्यक्रमात करण्यात आले. या दोन्ही कार्यक्रमाचे आयोजन पाणजू ग्रामपंचायती तर्फे करण्यात आले होते.

सोमवंशी क्षत्रिय समाज बांधवांचे लसीकरण

वसई – समाज मंदिर ट्रस्ट आणि सोमवंशी क्षत्रिय समाज महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवंशी क्षत्रिय समाज बांधवांसाठी आयोजित कोरोना लसीकरण शिबिरात १०० रुपयांमध्ये मध्ये ४०० जणांचे लसीकरण करण्यात आले. जनसेवा हॉस्पिटलच्या माध्यमातून वसई विकास बँकेचे उपाध्यक्ष जगदीश राऊत यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन दीप प्रज्वलित करून झाले. या प्रसंगी समाज मंदिर ट्रस्टचे चेअरमन नितीन म्हात्रे, सुरेश चौधरी, नरेंद्र राऊत, उमेश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

सामाजिक संघटनांच्या माध्यमातून लसीकरण

उल्हासनगर – अनुभूती संस्था, सी.एल.पी. इंडिया, सी. आई. आई. फाउंडेशन तसेच गोपाळ समाज श्रीकृष्ण मंदिर समिती यांच्या वतीने १५०० नागरिकांना मोफत कोरोना लस देण्यात आल्या आहेत. विठ्ठलवाडी येथील गोपाळ समाज या लोकवस्ती मध्ये गोपाळ समाज व इतर भटक्या व विमुक्त जमातीसाठी ब्लुमिंग बर्ड स्कूलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात गेल्या तीन दिवसांत एकूण १५०० नागरिकांना लस देण्यात आल्या.

डिजीटल कार्यशाळेत योगिक व्यायाम

डोंबिवली – रविवारी शिक्षक दिनाचे औचित्य साधून रेल चाईल्ड संस्था संचालित महात्मा गांधी विद्यामंदिर, डोंबिवली (प.) आणि योगश्रुत द वेलनेस कल्चर संयुक्त विद्यमाने, खास महाराष्ट्रातील शिक्षक बंधू व भगिनींसाठी राज्यस्तरीय डिजिटल कार्यशाळा हा उपक्रम संपन्न झाला. विविध जिल्ह्यांतील सुमारे ५०० शिक्षकांनी ऑनलाईन सहभाग घेतला. या वेबिनारच्या माध्यमातून जेष्ठ योग व आहार तज्ज्ञ श्रुती शशांक वैद्य यांनी मोबिलिटी, स्ट्रेचिंग, स्ट्रेंथिंग या पद्धतीने शिक्षकांकडून व्यायाम करुन घेतले.

पोलिसांच्या ताफ्यात अत्याधुनिक वाहने

पनवेल – पोलिसांसाठी शासनामार्फत नवनवीन उपक्रम राबविले जात आहेत. त्या अंतर्गत आता पोलीस ठाण्यांना अत्याधुनिक सोयींनी युक्त अशा जीप देण्यात आल्यामुळे पोलिसांचे काम अजून सुकर होणार आहे.

भाजप आमदारांमध्ये संघर्ष

नवी मुंबईत गणेश नाईकविरुध्द मंदा म्हात्रे शीतयुध्द पुन्हा पेटले

वार्ताहर/नवी मुंबई

महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक तोंडावर आली असताना नवी मुंबई भाजपात असलेले अंतर्गत वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहेत. स्थानिक नेत्यांकडून पक्षातील महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांना डावलण्यात येत असल्याचे सांगत भाजपच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी थेट आमदार गणेश नाईक यांच्या कार्यपध्दतीवर निशाणा साधत भाजपला घरचा आहेर दिला आहे.

एकेकाळी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये असताना नवी मुंबईतील ताई-दादांच्या भांडणाचे सूर आता भाजपमध्ये देखील उमटू लागले आहेत. नवी मुंबईतील भाजप नेते आणि पदाधिकाऱ्यांकडून पक्षाच्या विविध कार्यक्रमात आपणास जाणूनबुजून डावलले जात असून आपण महिला आमदार असूनही आपली सातत्याने मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न पक्षातीलच काही नेत्यांकडून सुरु असल्याचा आरोप बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी केला आहे. त्यामुळे येऊ घातलेल्या महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबईत दोन भाजप आमदारांमध्ये शह-काटशाहचा कलगीतुरा रंगणार असल्याचे चित्र पहावयास मिळणार आहे.

सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी गणेश नाईक आणि त्यांच्या सर्व सहकारी नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यापासून पक्षातील काही वरिष्ठांना हाताशी धरुन आपली मनमानी सुरु केली आहे. त्यावेळेस बेलापूर मधून गणेश नाईक तर ऐरोलीमधून संदीप नाईक यांनाच भाजपामधून तिकीट दिले जाणार असल्याचा संभ्रम कार्यकर्त्यांमध्ये निर्माण करुन माझे बेलापूरमधून तिकीट कापण्याचा प्रयत्न केला गेला. तेव्हा आपण तिकीट न मिळाल्यास अपक्ष निवडणूक लढवणार असल्याचा गर्भित इशारा पक्षाला दिल्यानंतर आपल्याला बेलापूरमध्ये पक्षातर्फे तिकिट देण्यात आले.

तेव्हापासून नवी मुंबईतील भाजपचे ऐरोलीतील सर्व नेते बेलापूर विधानसभा मतदारसंघामध्ये माझ्या क्षेत्रात ढवळाढवळ करुन माझ्याच कार्यकर्त्यांना फितवण्याचा प्रयत्न करु लागले. महापालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकांमधून डावलणे, आपल्या कार्यकर्त्यांची तिकीटे कापणे आदी उद्योग नाईकांकडून सुरु आहेत. संबंधित आमदाराने स्वतःच्या क्षेत्रात काय कार्य करायचे आहे ते करावे, दुसऱ्या आमदाराच्या कार्यक्षेत्रात घुसखोरी करुन स्वतःचा मोठेपणा दाखवण्याची गरज का पडते असा प्रश्न आमदार मंदा म्हात्रे यांनी प्रसारमाध्यमांसमोर उपस्थित केला आहे.

नुकतेच एपीएमसी येथे भाजप नेते नरेंद्र पाटील यांनी माथाडी कामगारांसाठी आयोजित केलेल्या लसीकरण कार्यक्रमाचे उद्घाटन विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ठेवले होते. यावेळी ऐरोलीचे आमदार गणेश नाईक यांना निमंत्रण होते. मात्र स्थानिक आमदार असलेल्या मंदा म्हात्रे यांना बोलवण्याचे सौजन्य नरेंद्र पाटील यांनी दाखवले नाही. बॅनरवरून स्थानिक आमदाराचा फोटोही गायब केला होता. हाच धागा पकडून मंदा म्हात्रे यांनी जाहीर भाषणात भाजपच्या स्थानिक पातळीवरील नेत्यांवर तोंडसुख घेतले. दोन वेळा विधानसभेवर निवडून येऊनही पक्षाकडून वारंवार डावलले जात असल्याची खंत आमदार मंदा म्हात्रे यांनी जाहीर भाषणात बोलून दाखवली.

२०१४ साली भाजपकडून पहिल्यांदा निवडून आल्यानंतर मोदी लाटेत निवडून आल्याचा आपल्यावर आरोप झाला. पण २०१९ ला मोदी लाट नसताना आपण स्वतःच्या कामावर प्रचंड मतांनी निवडून आलो असल्याचा दावा मंदा म्हात्रे यांनी केला आहे.

महिलांना सतत डावलण्यात येते – मंदा म्हात्रे

पक्षाच्या निष्ठावंत महिला पदाधिकारी कार्यकर्त्यांना हेतुपुरस्सर डावलण्याचे प्रयत्न सुरू असून भाजप पक्षाच्या बळकटीसाठी प्रयत्न करण्याऐवजी पक्षातील काही वरिष्ठ नेत्यांना हाताशी धरून पक्षात फूट पाडण्याचे प्रयत्न करीत आहेत. दोन वेळा विधानसभेवर निवडून येऊनही पक्षाकडून वारंवार डावलले जात असल्याची खंत आमदार मंदा म्हात्रे यांनी बोलून दाखवली.

आम्ही नेहमी सन्मानच केला – गणेश नाईक

आमदार मंदा म्हात्रे यांनी केलेले आरोप आमच्या संदर्भात नसतील तर ते अन्य कोणा संदर्भात असतील याचा शोध मीडियाने घ्यावा. आम्ही तर त्यांचा कुठल्याही कार्यक्रमात अपमान केला नाही. त्यांचा अपमान अन्य कोणी केला असेल तर ते आम्हाला माहीत नाही. आम्ही त्यांना वेळोवेळी आमच्या कार्यक्रमात मान दिला असल्याचे आमदार गणेश नाईक यांनी सांगितले.

फेरीवाल्यांवरील कारवाईवरुन एमबीएमसीच्या आयुक्तांकडून नगरसेवकांची कानउघाडणी

वार्ताहर/भाईंदर

मीरा-भाईंदर महापालिकेच्या महासभेत अनधिकृत बांधकामांना पालिका अधिकारी जबाबदार आहेत, असे सांगून आपले हात झटकणाऱ्या नगरसेवकांची पालिका आयुक्तांनी कानउघडणी केली आहे. फेरीवाल्यांवर कारवाई वेळी नगरसेवकांनी दबाव टाकू नये, असे सांगत एकप्रकारे शहरातील फेरीवाल्यांच्या विळख्याला नगरसेवक जबाबदार असल्याचा पलटवार केल्याचे मानले जात आहे.

मीरा-भाईंदर शहरात फेरीवाल्यांनी धुमाकूळ घातला आहे. प्रचंड प्रमाणात फेरीवाले वाढल्याने शहरातील एकही प्रमुख रस्ता, चौक, रेल्वे स्थानक हे फेरीवाल्यांपासून मोकळे नाहीत. नगरसेवक, राजकारणी व पालिका प्रशासन यांचे अर्थपूर्ण लागेबंध शहराच्या होणाऱ्या वाटोळ्यास कारणीभूत असल्याचे आरोप होत आहेत.

ठाणे पालिकेच्या महिला अधिकाऱ्यावर फेरीवाल्याने केलेल्या प्राणघातक हल्ल्यानंतर मीरा-भाईंदर मध्ये सुद्धा फेरीवाल्यांवर कारवाईची मागणी वाढली आहे. महासभेत त्याचे पडसाद उमटले. फेरीवाल्यांवर कारवाई होत नसल्याने अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करा व रस्ते मोकळे करा, असे काँग्रेस गटनेते जुबेर इनामदार म्हणाले. तर शिवसेना गटनेत्या नीलम ढवण यांनी स्थानिक लोकच फेरीवाले हवे, बाहेरचे फेरीवाले बंद करा अशी मागणी केली. तर दुसरीकडे चार वर्षे पत्र देऊनसुद्धा फेरीवाले पालिकेने हटवले नाहीत, अशी नाराजी भाजपच्या हेतल परमार यांनी व्यक्त केली.

महापौर ज्योत्स्ना हसनाळे यांनी सुद्धा 'वॉक विथ कमिशनर' उपक्रमात आयुक्त सकाळी ताफा घेऊन जातात व ताफा गेला की फेरीवाले येतात, अशी टीका केली. यावेळी फेरीवाल्यांच्या सर्वेक्षणाची यादी चुकीची आहे असून ७२२१ पैकी केवळ ६०० फेरीवाल्यांकडे शहरातील वास्तव्याचा दाखला असल्याने ती यादी प्रसिद्ध करू नये. महापौरांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा ठराव मंजूर झाला.

ठाण्यात फेरीवाल्यांवर व्यापक कारवाई

वार्ताहर/ठाणे

ठाण्यात फेरीवाल्यांवर पालिकेच्यावतीने धडक कारवाईची मोहीम व्यापक प्रमाणात सुरुच आहे. रविवारी शहरातील विविध ठिकाणी फेरीवाल्यांवर कारवाई करून हातगाड्या, टपऱ्या तसेच स्टॉल तोडण्यात आले.

नौपाडा-कोपरी प्रभाग समितीमधील आलोक हॉटेल, गावदेवी, तीन हात नाका, राममारुती रोड, तलावपाळी दुकानांसमोरील सामान उचलण्यात आले. तसेच रस्त्यावरील फेरीवाले हटवून ४ बॅग, ५ पुतळे चायनीज गाळा, १ ठेले, २ फळांच्या टोपल्या तर स्टेशन परिसर, जुनी महानगरपालिका, सुभाष पथ, जांभळी नाका, कोर्ट नाका येथील ठेले ७ कटलरी बॉक्स, ९ फळांच्या पाट्या ११ जप्त करण्यात आल्या. माजिवडा-मानपाडा येथील तुर्फेपाडा ब्रम्हांड, हिरानंदानी चौक परिसरातील कारवाई दरम्यान ४ स्टॉल, ३ टपरी, २ प्लास्टीक शेड व ५ बॅनर पोल तोडण्यात आले. तुर्फेपाडा येथील अनधिकृत प्लास्टिक व बांबूच्या सहाय्याने उभारण्यात आलेले १ शेड तोडण्यात आले. तसेच आर्केडिया शॉपिंग कॉम्प्लेक्समधील दुकानबाहेर लावण्यात आलेले ४ लोखंडी स्टॉल, हातगाडी, हिरानंदानी रोड वरील भंगार व जनरेटर मशीन जप्त करण्यात आले. ही कारवाई अतिक्रमण विभागाच्या उपआयुक्त अश्विनी वाघमळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त शंकर पाटोळे, संतोष वझरकर, अलका खैरे आणि सागर साळुंखे यांनी अतिक्रमण विभागाचे कर्मचारी आणि पोलीस यांच्या सहाय्याने केली.

दिव्यांगांचे बुधवारी कायदेभंग आंदोलन

वार्ताहर/ठाणे

दीड वर्षापूर्वी सोडत काढून पात्र दिव्यांगांना बीएसयूपीची घरे देण्यासाठी ताबापत्र ठामपाच्या वतीने देण्यात आली आहेत. मात्र, या घरांचा प्रत्यक्ष ताबा अद्यापही देण्यात आलेला नाही. घरांचा ताबा मिळावा, यासाठी दिव्यांगांनी आंदोलन करूनही कार्यवाही होत नसल्याने येत्या बुधवारी बृहन्महाराष्ट्र दिव्यांग विकास कामगार संघटना संचालित अखिल भारतीय दिव्यांग सेनेच्या वतीने ठामपा मुख्यालयात घुसून कायदेभंग आंदोलन करण्यात येणार आहे, अशी माहिती संघटनेचे मुख्य निमंत्रक मोहम्मद युसूफ खान यांनी दिली.

दिव्यांगांना बीएसयूपी योजनेतून परवडणारी घरे देण्यासाठी अर्ज मागविण्यात आले होते. या अर्जांमधून ४ फेब्रुवारी २०२० रोजी पात्र- अपात्र निश्चित करून ६ फेब्रुवारी २०२० रोजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते काशीनाथ घाणेकर नाट्यगृहात दिव्यांगांना चाव्या देण्याचा सोपस्कार पार पाडण्यात आला होता. या कार्यक्रमानंतर सुमारे दीड वर्षानंतरही काही अपवाद वगळता बहुतांश दिव्यांगांना घरांचा प्रत्यक्ष ताबा देण्यात आलेला नाही. विशेष म्हणजे , या घरांचा ताबा घेण्यासाठी अनेक दिव्यांगांनी आपल्या भाडेतत्त्वावरील घरांची अनामत रक्कम घेऊन पालिकेत जमादेखील केली आहे. मात्र, बीएसयूपी कक्ष स्थावर मालमत्ता विभागाकडे तर स्थावर मालमत्ता विभाग बीएसयूपी कक्षाकडे जबाबदारी ढकलत आहे. माहिती अधिकारातही दिवा, तुळशीधाम, कासारवडवली, ब्रम्हांड, रिव्हरवूड येथील घरांचा प्रत्यक्ष ताबा देण्यात आला नसल्याची माहिती देण्यात आली आहे. या घरांचा ताबा मिळावा, यासाठी १२ जुलै रोजी दिव्यांगांनी पालिका मुख्यालयासमोर भर पावसात धरणे आंदोलनही केले होते. त्यावेळेस हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, दीड महिन्यात दिव्यांगांना घरांचा ताबा देण्यात आलेला नाही. त्यामुळेच येत्या बुधवारी सर्व दिव्यांग पालिका मुख्यालयात घुसून कायदेभंग आंदोलन करणार आहेत, असे युसूफ खान यांनी सांगितले.

दरम्यान, ज्या दिव्यांगांना ताबा पत्र मिळूनही प्रत्यक्ष घरांचा ताबा मिळालेला नाही, अशा दिव्यांगांनी अखिल भारतीय दिव्यांग सेनेशी संपर्क साधून या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहनही खान यांनी केले आहे.

सातबारासाठी शेतकऱ्यांचे महसुलमंत्र्यांना साकडे

वार्ताहर/वसई

महाराष्ट्र सरकारने जुन्या तगाई कर्जाला सर्वसकट तगाई कर्जमाफी दिली असल्यामुळे कर्ज न भरलेल्या शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावर अद्यापही सरकारी आकारपडीत नोंद दिसत आहे. ही नोंद रद्द करून मूळ शेतकऱ्यांची नावे सातबाऱ्यावर लावण्यात यावी म्हणून मागील कित्येक वर्षे शेतकरी प्रशासनाकडे पाठपुरावा करीत आहेत. परंतु आजपर्यंत शेतकऱ्यांना दिलासा मिळत नाही. ही शेतकऱ्यांची कैफियत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या पर्यावरण विभागाचे प्रदेशाध्यक्ष समीर वर्तक यांच्या नेतृत्वाखाली गेलेल्या शेतकऱ्यांनी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्याकडे मांडली आहे.

१९४८ साली चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना उभारी देण्यासाठी तगाई कर्ज दिले गेले. परंतु परतफेड न केल्यामुळे १९६३ च्या दरम्यान ही सर्व शेती सरकारी आकारपडीत म्हणून सातबाऱ्यावर नोंद झाली होती. १९८९ साली महाराष्ट्र सरकारने सर्वसकट तगाई कर्जमाफी दिली होती. मात्र सातबाऱ्यावरील सरकारी आकारपडीत नोंद रद्द झाली नाही. यामुळे कित्येक वर्षे शेतकरी ही नावे येण्यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा करीत आहेत, परंतु आजपर्यंत शेतकऱ्यांना दिलासा मिळालेला नाही. यावर लवकरच शेतकऱ्यांचे काम मार्गी लावण्यात येईल, असे आश्वासन महसूलमंत्री थोरात यांनी दिले. शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळात समीर वर्तक यांच्यासोबत वाघोलीचे माजी सरपंच टोनी डाबरे, फ्रान्सिस मस्करण, ऑगस्तिन (नाना) मस्करण, कुंदन नाईक, तारिक खान उपस्थित होते.

रेल्वेची केबल चोरणाऱ्याला अटक

वार्ताहर/डोंबिवली – रेल्वेच्या सिग्नलची सुमारे २० हजार रुपये किमतीची केबल चोरणाऱ्या चोरट्याला कसारा आरपीएफच्या टीमने कल्याणच्या राणा श्वानाच्या मदतीने अटक केली. न्यायालयाने त्याला १७ सप्टेंबर पर्यंत न्यायालयीन कोठडीत ठोठावली आहेत. कसारा घाटातील सिंगल वायरच्या चोरीमुळे रेल्वे प्रशासन त्रस्त झाले होते. त्यातच २ सप्टेंबर रोजी सिग्नल केबल चोरी झाल्याची घटना घडली होती. कसारा रेल्वे पोलिसांनी राणा श्वानाची मदत घेतली होती. राणाने आपला मोर्चा कसारा घाटातील जंगलात असलेल्या झोपडीकडे वळवला त्याच्या मागे कसारा आरपीएफचे पोलीस पथक घटनास्थळी पोहोचले असता एका झोपडीबाहेर सिग्नलची वायर साठवून ठेवण्यात आल्याचे दिसून आले.

सकाळची भाईंदर लोकल पुन्हा सुरू करा : गीता जैन

वार्ताहर/भाईंदर

सकाळी ११.५२ वाजताची बंद करण्यात आलेली भाईंदर लोकल तात्काळ सुरू करण्यात यावी, अशी मागणी आमदार गीता जैन यांनी रेल्वेकडे केली आहे.

पश्चिम रेल्वे महाप्रबंधक आलोक कंसल यांची चर्चगेट येथील पश्चिम रेल्वेचे मुख्य कार्यालय येथे आमदार गीता जैन यांनी भेट घेतली. यावेळी पश्चिम रेल्वे सल्लागार समिती सदस्य शैलेश गोयल उपस्थित होते. ११.५२ ची भाईंदर लोकल मीरा-भाईंदरच्या प्रवाशांसाठी दिलासा देणारी होती. परंतु रेल्वे प्रशासनाने सदर लोकल बंद केल्याने प्रवाशांना त्रास होत आहे. तसेच भाईंदर व मीरारोड रेल्वे स्थानकातील समस्या दूर करणे, आदी मागण्या आमदार जैन यांनी केल्या. यावेळी महाप्रबंधक यांनी ही भाईंदर लोकल पुन्हा चालू करण्यासह प्रवाशांच्या समस्या सोडवण्याबाबत निर्णय घेण्याचे आश्वासन दिल्याची माहिती जैन यांनी दिली आहे.

फिनो पेटेक लिमिटेड

सीआयएन : यु७२९००एमएच२००६पीएलसी१६२६५६
नोंदणीकृत कार्यालय : माईंडस्पेस जुईनगर, ९वा मजला, प्लॉट क्र. जन २/१/एफ, टॉवर १, टीटीसी इंडस्ट्रियल क्षेत्र, एमआयडीसी शिरवाने, जुईनगर नवी मुंबई ठाणे – ४०० ७०६.
दूर. क्र. +९१ २२ ७१३७ ७०००
ई-मेल : jitendra.garg@finopaytech.com **वेबसाइट :** www.finopaytech.com

व्हिडिओ कॉन्फरंसिंग (व्हीसी)/अदर ऑडिओ व्हिज्युअल मिन्स मार्फत घेण्यात येणाऱ्या १५व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या संदर्भातील माहिती

सूचना याद्वारे देण्यात येते की **फिनो पेटेक लिमिटेड ('कंपनी') ची १५वी वार्षिक सर्वसाधारण सभा (''एजीएम'')** ही १५व्या एजीएमच्या सूचनेत नमूद केलेले कामकाज करण्यासाठी कंपनी अधिनियम, २०१३ (''अधिनियम'') आणि त्या अंतर्गत केलेले नियम सहवाचता निगम व्यवहार मंत्रालयाद्वारे जारी अनुक्रमे जनरल सर्क्युलर क्र. १४/२०२०, १७/२०२०, २०/२०२० आणि ०२/२०२१, दिनांक ८ एप्रिल, २०२०, १३ एप्रिल, २०२०, ५ मे, २०२० आणि १३ जानेवारी, २०२१ (''एमसीए सर्क्युलर्स'') च्या सर्व प्रयोज्य तरतुदींच्या अनुपालनात सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थिती शिवास व्हीसी/ओएव्हीएम मार्फत **गुरुवार, ३० सप्टेंबर, २०२१ रोजी दु. १२.०० (भाप्रवे)** घेण्यात येणार आहे.

सभासदांनी पुढे नोंद घ्यावी की, वरील नमूद सर्क्युलर्स आणि सरकारच्या पर्यावरणन स्नेही धोरणाला अनुसरून १५व्या एजीएमची सूचना आणि वित्तीय वर्ष २०२०-२१ करिता वार्षिक अहवाल हा शुक्रवार, २७ ऑगस्ट, २०२१ रोजीस डिपॉझिटरीज कडे असलेले लाभकारी मालक/सभासद रजिस्टरमध्ये नावे असलेल्या आणि ज्यांचे ईमेल पत्ते कंपनी किंवा शेअर ट्रान्स्फर एजंट किंवा त्यांच्या संबंधित डिपॉझिटरीजकडे नोंदविलेले असतील सभासदांना फक्त ईमेल मार्फत पाठविण्यात येईल.

प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स धारण केलेले किंवा कंपनी/डिपॉझिटरीकडे त्यांचे ईमेल पत्ते न नोंदविलेल्या/अपडेट न केलेल्या सभासदांना नाव, फोलिओ क्रमांक, प्रमाणपत्र क्रमांक, पॅन, मोबाईल नंबर आणि ईमेल आयडी इ. पुरवुन त्यांच्या खालील नमूद पत्त्यावर कंपनीचे रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट (''आरटीए'') म्हणजेच ॲन्ड्रॉईट कॉर्पोरेट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड कडे रितसर सही केलेले विनंती पत्र पाठवुन त्यांचे ई-मेल पत्ते नोंदविण्याची/अपडेट करण्याची विनंती करण्यात येत आहे.

ज्या सभासदांनी सूचना पाठविल्यानंतर कंपनीचे शेअर्स संपादित केले आहेत आणि कंपनीचे सभासद बनले आहेत आणि कट ऑफ तारीख म्हणजेच गुरुवार, २३ सप्टेंबर, २०२१ रोजीस शेअर्स धारण केलेले आहेत ते evoting@nsdl.co.in येथे विनंती पाठवुन युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करू शकतात. तथापी सभासदाने दूरस्थ ई-मतदान आणि एजीएम दरम्यान ई-मतदानासाठी एनएसडीएलकडे अगोदर नोंद केली असल्यास मतदान करण्यासाठी विद्यमान युजर आयडी आणि पासवर्ड वापरू शकतात.

सभासद फक्त व्हीसी/ओएव्हिएम मार्फत एजीएमला हजर आणि सहभागी होऊ शकतात. व्हीसी/ओएव्हिएम मार्फत एजीएमला हजर राहण्याची माहिती आणि दूरस्थ ई-मतदानने सहभागी होणे किंवा एमजीएम दरम्यान ई-मतदानामार्फत मतदान करण्याची पद्धत एजीएमच्या सूचनेत दिलेली आहे. व्हीसी/ओएव्हिएम मार्फत सहभागी होणाऱ्या सभासदांना अधिनियमाच्या कलम १०३ अंतर्गत गणपूर्ती ठरविण्यासाठी मोजण्यात येईल. सूचना आणि वार्षिक अहवाल कंपनीची वेबसाईट www.finopaytech.com वर सुद्धा उपलब्ध करण्यात येईल. दूरस्थ ई-मतदान आणि एजीएमच्या दरम्यान ई-मतदानासाठी कंपनीने एनएसडीएल सह आवश्यक व्यवस्था केली आहे.

सभासदांना एजीएममध्ये सहभागी होणे, दूरस्थ ई-मतदानामार्फत आणि एजीएम दरम्यान ई-मतदान आणि व्हीसी/ओएव्हीएम मार्फत एजीएमला हजर राहण्यासाठीची माहिती, तपशिल आणि एजीएमच्या सूचनेत नमूद केलेल्या सर्व टीपा काळजीपूर्वक वाचण्याची विनंती करण्यात येत आहे.

वरील माहिती ही एमसीए सर्क्युलर्सच्या अनुपालनात आणि कंपनीच्या सर्व सभासदांच्या माहिती आणि लाभासाठी जारी करण्यात येत आहे.

सभासद खालील नमूद पत्त्यावर कंपनीच्या आरटीएना संपर्क करू शकतात:

ॲन्ड्रॉईट कॉर्पोरेट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड
१८-२० जाफरभॉय इंडस्ट्रियल इस्टेट,
१ला मजला, मखवाना रोड, मरोळ नाका,
अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०००५९, भारत.
फोन क्र. +९१ (०)२२ ४२२७०४००
ईमेल : N.surreash@adroitcorporate.com

फिनो पेटेक लिमिटेड करिता
सही/-
जितेंद्र गर्ग
कंपनी सचिव

दिनांक : ०६ सप्टेंबर, २०२१
ठिकाण : नवी मुंबई

बॉम्बे स्वदेशी स्टोअर्स लिमिटेड

सीआयएन : U74999MH1905PLC000223
नोंदणीकृत कार्यालय : वेस्टर्न इंडिया हाउस, सर. पी. एम. रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१. **दूर. क्र.** +९१ २२ २२८८५०४८/४९,
कॉर्पोरेट कार्यालय : ३०४, ३ रा मजला, हबटाउन सोलारिस, प्रोफ. एनएस फडके मार्ग, तेली गल्ली समोर, विजय नगर, अंधेरी पूर्व, मुंबई-४०० ०६९. **दूर. :** +९१ २२ ६८३५ १६००,
वेबसाइट : www.thebombaystore.com **ई-मेल :** investor@bombaystore.com

व्हिडीओ कॉन्फरेंसिंग (व्हीसी)/अदर ऑडिओ व्हिज्युअल मीन्स (ओएव्हीएम) मार्फत आयोजित कंपनीच्या ११५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, ई-मतदान माहिती व बुक क्लोजर

सूचना याद्वारे देण्यात येत आहे की, कंपनीच्या सभासदांची ११५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) मंगळवार, २८ सप्टेंबर, २०२१ रोजी स. ११.०० वाजता एजीएमच्या सूचनेमध्ये नमुद कामकाज करण्याकरिता कंपनी अधिनियम, २०१३ आणि त्या अंतर्गत केलेले नियम सहवाचता निगम व्यवहार मंत्रालय यांच्याद्वारे जारी सर्क्युलर क्र. १४/२०२० दिनांक ८ एप्रिल, २०२०, सर्क्युलर क्र. १७/२०२०, दिनांक १३ एप्रिल, २०२०, सर्क्युलर क्र. २०/२०२० दिनांक ५ मे, २०२० सर्क्युलर क्र. ०२/२०२० दिनांक १३ जानेवारी, २०२१ (''एमसीए सर्क्युलर्स'') च्या प्रयोज्य तरतुदींच्या अनुपालनात व्हिडीओ कॉन्फरेंसिंग (व्हीसी)/अन्य ऑडिओ व्हिज्युअल मीन्स (ओएव्हीएम) मार्फत आयोजित केली आहे. सीडीएसएल ई-मतदान प्रणाली मार्फत एजीएमच्या लाईव्ह वेबकास्ट पाहण्याकरिता वा व्हीसी/ओएव्हीएम मार्फत एजीएमच्या हजर राहण्याची सुविधा प्रदान करून दिली आहे.

एजीएमच्या सूचनेची ईलेक्ट्रॉनिक प्रत व वार्षिक अहवाल वित्तीय वर्ष २०२०-२१ सभासदांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यांवर व तसेच कंपनीचे निबंधक व शेअर ट्रान्सफर एजन्ट/डिपॉझिटरी पार्टिसीपंटसह ई-मेल पत्त्यावंर पाठवण्यात आलेली आहे. सूचना व वार्षिक अहवाल २०२०-२१ सूचना कंपनीची वेबसाइट www.thebombaystore.com वर व सीडीएसएल वेबसाइट www.evotingindia.com वर उपलब्ध आहे.

डिमॅट माध्यमाने शेअर्स धारण केलेल्या सभासदांना डिपॉझिटरी पार्टिसिपंटसंकडे त्याचे ईमेल पत्ते आणि मोबाईल नंबर नोंदविण्याची विनंती करण्यात येत आहे, प्रत्यक्ष माध्यमाने rnt.helpdesk@linkintime.co.in येथे कंपनीचे रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट, लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडकडे त्यांचा ई-मेल मत्ता आणि मोबाईल नंबर सादर करण्याची विनंती करण्यात येत आहे.

कंपनी कायदा, २०१३ च्या अनुच्छेद १०८ च्या तरतूदी अंतर्गत व वेळोवेळी सुधारीत कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम २० ला अनुसरून कंपनी त्यांच्या सभासदांना www.evotingindia.com येथील सीडीएसएलची ईलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीचा वापर करून एजीएमची सूचनेमध्ये विहित सर्व ठरावांवर विचार करून ईलेक्ट्रॉनिकली त्यांचे मतदान करण्याची सुविधा पुरविल्याचा आनंद होत आहे.

सर्व सभासदांना याद्वारे सूचित करण्यात येते की,

ए. एजीएमच्या सूचनेत नमूद कामकाज ईलेक्ट्रॉनिक स्वरूपात मतदानाच्या माध्यमातून करता येईल.

बी. ज्या व्यक्तीची नावे कट ऑफ तारीख म्हणजेच मंगळवार, २१ सप्टेंबर, २०२१ रोंसे डिपॉझिटरीकडे असलेले लाभकारी मालकांचे रजिस्टर किंवा सभासद रजिस्टरमध्ये नोंदविलेली असतील तेच फक्त सीडीएसएल ई-मतदान प्लॅटफॉर्म (www.evotingindia.com) मार्फत परोक्ष ई-मतदान सुविधा घेण्यासाठी किंवा एजीएममध्ये मतदान (दूरस्थ ई-मतदान) करण्यासाठी हक्कदार राहतील.

सी. परोक्ष ई-मतदानाला **शनिवार २५ सप्टेंबर, २०२१ रोजी (स. ०९.०० वा.)** सुरुवात करण्यात येईल आणि **सोमवार २७ सप्टेंबर, २०२१ (साय. ५.०० वा.) संपेल.** ई-मतदान मॉड्युल त्यानंतर सीडीएसएल द्वारे बंद करण्यात येईल. सभासदांनी ठरावावर एकदा केलेल्या मतदानात सभासदाला त्यानंतर बदल करण्याची परवानगी देण्यात येणार नाही. त्यानंतर ठरावावांवर मतदान करण्याकरिता सभासदांचे मतदान अकार्यरत मानण्यात येईल.

डी. कोणीही व्यक्ती ज्यांनी सूचना पाठविल्यानंतर कंपनीचे शेअर्स संपादित केले आहेत व कंपनीचे सभासद बनले आहेत आणि मंगळवार २१ सप्टेंबर, २०२१ म्हणजेच कटऑफ तारखेस शेअर्स धारण केलेले आहेत ते वरील दस्तावेज पाहण्यासाठी कंपनीच्या वेबसाईटला भेट देवू शकतात असे सभासद helpdesk.evoting@cdslindia.com वर विनंती पाठवून त्यांचा लॉगीन आयडी व पासवर्ड प्राप्त करून परोक्ष ई-मतदानामार्फत त्यांचे मतदान करू शकतात. तथापि, जी व्यक्ती आधीच सीडीएसएलसह नोंदणीकृत आहे ते मतदान करण्याकरिता विद्यमान युजर आयडी व पासवर्ड चा वापर करू शकतात.

ई. एजीएमला हजर असलेले सभासद ज्यांनी परोक्ष ई-मतदानाद्वारे त्यांचे मतदान केलेले नाही ते एजीएम दरम्यान ई-मतदानामार्फत त्यांचे मतदान कर